मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# SACCC चे आरक्षण रद्द करण्याची मागणी

## महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून जाधववाडीच्या नागरिकांची जोरदार निदर्शने

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन सुधारीत विकास आराखड्यात लादलेले चिखली जाधववाडी येथे सुपर एडमिनिस्ट्रेटीव्ह कम कमर्शियल कॉम्पलेक्स (SACCC) अर्थात भव्य प्रशासकीय व व्यापार संकुलाचे महाआरक्षण रद्द करावे या मागणीसाठी नागरिकांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना भेटून निवेदन दिले. गरज नसताना जाणीवपूर्वक हे आरक्षण टाकल्याने महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून नागरिकांनी पालिका प्रवेशद्वारात जोरदार घोषणा देत निदर्शने केली.



चार महिन्यांपूर्वी चिखली, कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील ४५०० अतिक्रमणे भुईसपाट करण्यात आली. कारवाईत या परिसरातील ८०० लघुउद्योग संपले, लाखावर बेरोजगार झाले आणि स्थानिकांना दरमहा मिळणारे १० कोटींचे भाडे उत्पन्न बुडाले. नंतर याच ९५० एकर क्षेत्रावर टीपी स्किम लादण्यात आली तेव्हा गावकरी उसळून आल्याने शेखर सिंह यांच्या प्रशासनाला लोटांगण घावलायची वेळ आली होती.

आता पुन्हा विकास आराखड्यात १७५ एकरावर अनावश्यक आरक्षण टाकल्याने जाधववाडीचे नागरिक प्रचंड संतापले आहेत. सुमारे १५० लघुउद्याजकांच्या जागा या आरक्षणात जाणार असल्याने त्यांनीही उठाव केला असून वेळप्रसंगी तीव्र आंदोलन आणि कायदेशीर लढाईचा इशारा सर्वांनी दिला आहे.

माजी महापौर राहुल जाधव यांच्या नेतृत्वाखाली पाऊनशे नागरिकांनी आज दुपारी आयुक्त शेखर सिंह यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले. विकास आराखड्यातील १७५ एकराचे हे महाकाय आरक्षण काढून टाका म्हणून सर्वांनी वैयक्तिक तसेच सामुदायिक हरकत दिली. प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद दिसत नसल्याने संतप्त नागरिकांनी पालिका भवनाच्या प्रवेशद्वारातच जोरदार निदर्शने केली आणि घोषणा दिल्या.

चिखली-जाधववाडी येथे एसएसीसी चे आरक्षणासंदर्भात आयुक्तांकडे सर्वांनी गाऱ्हाणे मांडले. यावेळी महापौर राहुल जाधव यांच्यासह माजी नगरसेवक माऊली जाधव, युवानेते विशाल आहेर, एडव्होकेट विशाल जाधव, स्वप्निल शेकडे, सामाजिक कार्यकर्ते संतोष जाधव, माजी सरपंच रवीशेठ जाधव, विकास जाधव, विलास जाधव, संजय महादेव जाधव, गणेश किसन जाधव, उद्योजक प्रफुल जाधव, भैरवनाथ डीपी कृती समितीचे सर्व सदस्य सहभागी झाले होते.

### आयुक्तांचे सकारात्मक आश्वासन : राहुल जाधव

» महापालिका आयुक्तांनी आम्हाला सकारात्मक आश्वासन दिले, असे माजी महापौर राहुल जाधव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. निवेदन देताना आयुक्तांना सर्वांनी हे स्पष्ट केले की, १७५ एकरावचे हे आरक्षण आम्हाला भूमिहिन करणार आहे. उद्या कुटुंबा वाढले म्हणून दुसरीकडे घर बांधायचे तरी जागा शिल्लक नसेल. पूर्वीच्या विकास आराखड्यात जसे निवासी होते तसेच सर्व क्षेत्र निवासी करावे, अशी एकमुखी मागणी सर्वांनी केली. त्यानंतर आयुक्तांनी ठोस आश्वासन दिले. शेतकऱ्यांच्या आणि जागा मालकांच्या भावनांवर आयुक्त म्हणाले, तुमच्या सर्वांच्या भावना मी ओळखल्या आहेत. या संदर्भात लवकरात लवकर न्याय देऊ.

---

# लोणावळा, मावळातील पर्यटनस्थळ परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

## पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे, धोकादायक वळणे आदी ठिकाणी सेल्फी काढण्यास प्रतिबंध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील लोणावळा परिसरातील तसेच मावळ तालुक्यातील ऐतिहासिक वास्तू, गड, किल्ले व स्मारके, पर्यटनस्थळे, धरणे आदी ठिकाणी वर्षाविहार, पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्याद्दष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी पर्यटनस्थळ परिसरात ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

लोणावळा परिसरातील एकविरा देवी, कार्ला लेणी, भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, टायगर पॉईट, लायन्स पॉईट, शिवलिंग पॉईट, पवना धरण या परिसरात प्रामुख्याने पावसाळी पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होते. अशावेळी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सदर ठिकाणांच्या अनुषंगाने हे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशानुसार पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात उतरणे व पोहणे, धबधब्यावर जाणे अथवा



पाण्याच्या प्रवाहाखाली बसणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे, धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे आदी ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करण्यास प्रतिबंध राहील.

पावसामुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करणे, मद्यधुंद अवस्थेत प्रवेश, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे, वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे, वाहनांची ने-आण करताना बेदरकारपणे वाहन चालवणे, धोकादायक स्थितीत वाहन ओव्हरटेक करणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लास्टिकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लास्टिकचे साहित्य उघड्यावर व इतरत्र फेकण्यासही प्रतिबंध राहील.

सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगल टवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य अश्लिल हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्जा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डिजे यंत्रणा वाजविणे, गाडीतील स्पीकर, वूफर मोठ्या आवाज वाजविणे व त्यामुळे ध्वनीप्रदूषण करणे, ज्या कृतीमुळे ध्वनी, वायु व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करण्यास प्रतिबंध असेल. धबधबे, धरणे व नदी आदी परिसरात सर्व दुचाकी, तीनचाकी, चारचाकी व सहा चाकी वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. केवळ अत्यावश्यक सेवेतील वाहनांना अनुमती असेल.

# पुण्यात 42 प्रभाग, रचनेत बदलाची शक्यता

## 2017च्या निवडणुकीप्रमाणे आगामी महापालिका निवडणूक होणार : 2011ची लोकसंख्या गृहीत धरली जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महापालिकेच्या निवडणुकांसाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या प्रभाग रचनेनुसार पुणे महापालिकेची निवडणूक ही चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार आहे. २०१७ च्या निवडणुकीप्रमाणे आगामी महापालिका निवडणूक होणार असून, २०११ ची लोकसंख्या गृहीत धरली जाणार आहे. त्यामुळे पुण्यात ४२ प्रभाग होणार आहेत.




महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आलेली उरुळी आणि फुरसुंगी ही दोन गावे राज्य सरकारने वगळल्यामुळे प्रभाग रचनेत बदल करावा लागणार आहे. त्यामुळे नगरसेवकांची संख्या १६६ ऐवजी एक कमी होऊन १६५ होण्याची शक्यता महापालिका प्रशासनाने वर्तविली आहे.

महापालिकेत ३० लाख लोकसंख्येला १६१ नगरसेवक आणि त्या पुढील प्रत्येक एक लाख लोकसंख्येला एका नगरसेवकाची संख्या वाढवली जाते. २०११ मध्ये पुणे शहराची लोकसंख्या ३१ लाख २४ हजार होती. नवीन ११ गावांची लोकसंख्या सुमारे दीड लाख आणि त्यानंतर नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांची लोकसंख्या अडीच लाखांच्या आसपास होती. ही एकत्रित लोकसंख्या सुमारे ३५ लाख ५० हजारांच्या जवळपास जाते. त्यामुळे ३० लाखानंतर प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एक नगरसेवक असणार आहे.

**शेवटच्या प्रभागांत सदस्य संख्या कमी**

पुणे शहर तसेच महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांची २०११ ची लोकसंख्या लक्षात घेता आगामी महापालिका निवडणुकीत ४२ प्रभाग असणार आहेत. यामध्ये ४० किंवा ४१ प्रभाग चार सदस्यांचे असण्याची शक्यता आहे. दोन प्रभाग तीन सदस्यांचे किंवा एक प्रभाग दोन सदस्यांचा असू शकतो, असे महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### नगरसेवक 166 की 165?

**» विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद केली. २०२१ मध्ये महापालिकेच्या हद्दीत २३ गावे समाविष्ट झाल्याने २०१७ च्या निवडणुकीची प्रभाग रचना बदलावी लागणार आहे. दोन गावे वगळल्याने या गावांतील लोकसंख्या कमी होणार आहे. त्यामुळे महापालिकेतील सभासद संख्या १६६ वरून एकने कमी होऊन १६५ होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.**

> पुणे महानगरपालिकेची आगामी निवडणूक चार सदस्य प्रभाग पद्धतीने होणार असल्याचे आदेश राज्य सरकारकडून आले आहेत. याचा अभ्यास करून महापालिका पुढील नियोजन करण्यासाठी सज्ज आहे.
>
> **- प्रसाद काटकर, निवडणूक अधिकारी, पुणे महापालिका.**

---

# पुण्यात महिला विशेष बससेवांमध्ये वाढ

## गैरप्रकार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून 'पीएमपी' प्रशासनाचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

महिला प्रवाशांचा प्रवास सुरक्षित आणि सुलभ व्हावा, या उद्देशाने पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) महिला विशेष बससेवांमध्ये वाढ केली आहे. गुरुवारपासून (१२ जून) कात्रज, हडपसर, स्वारगेट, भेकराईनगर अशा विविध १९ मार्गांवर महिला प्रवाशांसाठी विशेष 'पीएमपी' धावणार आहे. त्यामुळे केवळ महिलांसाठी पीएमपी सेवा देणारे ३३ मार्ग झाले आहेत. सद्य:स्थितीत १६ बसद्वारे १४ मार्गांवर महिलांसाठी बस धावत आहे.




सद्य स्थितीला पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रापर्यंत ३८१ मार्गांवर दररोज बस संचलन होत आहे. त्यापैकी १४ मार्गांवर महिलांसाठी स्वतंत्र विशेष बस सेवा सुरू आहे. दैनंदिन प्रवासातील गर्दी, महिला-विद्यार्थिनींची होणारी छेडछाड, मौल्यवान दागिन्यांची चोरी, लज्जास्पद वर्तन आणि अनेक गैरप्रकारांबाबत महिला प्रवाशांकडून वारंवार तक्रारी येतात. हे गैरप्रकार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पोलिसांचे स्वतंत्र पथक करण्यात आले असताना 'पीएमपी' प्रशासनाने महिलांसाठी विशेष सेवा देणाऱ्या मार्गांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार १९ नवीन मार्ग निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती 'पीएमपी' प्रशासनाने दिली.

### कोणत्या आगारातून कोठपर्यंत?

**» कात्रज, अप्पर डेपो, भेकराईनगर, स्वारगेट, निगडी, बाणेर, शेवाळवाडी, हडपसर, चऱ्होली, न. ता. वाडी, भेकराईनगर, भोसरी या आगारांमधून आळंदी, मुक्ताई चौक, धायरी डीएसके, महानगरपालिका भवन, पुणे स्थानक, पिंपळे गुरव, निगडी, लोहगाव, वाघोली, पिंपरी-चिंचवड गांव, हिंजवडी माण फेज तीन या ठिकाणांपर्यंत १९ मार्ग निश्चित केले आहे. सकाळी ९ पासून सायंकाळी साडेसहापर्यंत महिलांच्या विशेष बसचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. या फेऱ्यांचे नियोजन करताना उर्वरित मार्गांवरील फेऱ्यांमध्ये कुठलाच बदल करण्यात आलेला नसल्याचे पीएमपी प्रशासनाने नमूद केले आहे.**

> प्रवाशांची गर्दी आणि महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने 'पीएमपी' प्रशासनाने महिला विशेष बस सेवेच्या मार्गांमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे महिलांची सुरक्षितता निश्चित होणार असून, सुलभ प्रवास करता येईल.
>
> **- दीपा मुधोळ-मुंडे, अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

# मोशी येथील रूग्णालयासाठी 550 कोटींचे कर्ज; प्रक्रिया अंतिम टप्प्यात

## महापालिकेच्या तब्बल 4 हजार कोटी रुपयांच्या ठेवी असताना कर्ज घेऊन विकासकामे करण्याचा निर्णय शंका निर्माण करणारा आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने बॉण्डद्वारे शहरातील विकासकामांसाठी 400 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. आता मोशी येथील रुग्णालयासाठी 550 कोटींचे कर्ज घेण्यात येत आहे. ती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. महापालिकेच्या तब्बल 4 हजार कोटी रुपयांच्या ठेवी असताना कर्ज घेऊन विकासकामे करण्याचा निर्णय शंका निर्माण करणारा आहे.

शहरात पवना, मुळा आणि इंद्रायणीनदी सुधार प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यावर तब्बल तीन हजार कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्च करण्यात येणार आहे. त्या प्रकल्पासाठी महापालिकेने सन 2023 मध्ये म्युनिसिपल बॉण्ड काढून 200 कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे.

त्या रकमेतून मुळा नदी सुधार प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यातील काम सुरू आहे. प्राधिकरण, निगडीत सुरू असलेल्या हरितसेतू प्रकल्पासाठी तसेच, टेल्को रस्त्यावर अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार काम करण्यासाठी 200 कोटींचे ग्रीन बॉण्ड काढून कर्ज काढण्यात आले आहे. असे एकूण 400 कोटी रुपयांचे कर्ज महापालिकेने काढले आहे.




### कर्ज काढण्याची प्रकिया अंतिम टप्प्यात

» मोशी रुग्णालय आणि दापोडी ते निगडी अर्बन स्ट्रीट डिझाईन या दोन कामासाठी महापालिका 550 कोटी रूपयांचे कर्ज राष्ट्रीयीकृत बँकेकडून घेण्यात येत आहे. ती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. लवकरच ती सर्व रक्कम महापालिकेच्या बँक खात्यात जमा होईल. कर्ज काढल्याने कामास आर्थिक शिस्त लागते. काम मुदतीत पूर्ण करावे लागते. महापालिकेचे पत नामांकन ऐऐप्लस असल्याने कर्ज मिळत आहे, असे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने मोशी येथील 15 एकर जागेत 8 मजली 850 बेडचे मल्टिस्पेशालिटी रुग्णालयात बांधण्यात येत आहे. त्याचे काम सुरू केले आहे. त्यासाठी एकूण 750 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ती इमारत पर्यावरपूरक व हरित संकल्पनेवर आधारित आहे. तसेच, दापोडी ते निगडी मार्गाच्या दोन्ही बाजूच्या सर्व्हिस रस्त्यावर अर्बन स्ट्रीट डिझाईनचे काम केले जात आहे. त्यासाठी 170 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या दोन्ही कामांसाठी महापालिका 550 कोटी रुपयांचे कर्ज काढत आहे. त्याची नोटीस महापालिकेने डिसेंबर 2023 ला प्रसिद्ध केली होती. त्यानंतर विरोधकांनी महापालिकेवर टीका करीत कर्ज घेऊन पालिकेस कर्जबाजारी करू नका. प्रशासकीय राजवटीत कर्ज घेण्याचा मोठा निर्णय घेण्यात येऊ नये, अशी मागणी केली होती. त्याची दखल घेऊन प्रशासनाने 550 कोटी रुपये कर्ज घेण्याचा निर्णय फिरविल्याची चर्चा महापालिका वर्तुळात होती.

### पालिकेवर व्याजाच्या रकमेचा भुर्दंड

» म्युन्सिपल बॉण्डद्वारे 200 कोटी आणि ग्रीन बॉण्डद्वारे 200 कोटी रुपयांचे महापालिकेने कर्ज घेतले आहे. दोनशे कोटींच्या ग्रीन बॉण्डसाठी वर्षाला 15 कोटी रुपयांप्रमाणे पाच वर्षांसाठी 75 कोटी रुपये व्याज भरावे लागणार आहे.केंद्राकडून महापालिकेस 20 कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळत असले तरी, 55 कोटी रुपये अतिरिक्त भुर्दंड महापालिकेवर पडणार आहे. 200 कोटी म्युन्सिपल बॉण्डसाठीवरील व्याजाची रक्कम मोठी आहे. 550 कोटी रुपयांच्या बँक कर्जावरही व्याजापोटी महापालिकास कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड पडणार आहे.

### अत्यावश्यक कामांसाठी नाही कर्ज

» महापालिकेच्या तब्बल 4 हजार कोटी रुपयांचा ठेवी असताना असे कर्ज काढण्याची गरज काय, असा प्रश्न शहरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. पुणे महापालिकेने पाणीपुरवठा योजनेसाठी 200 कोटी रुपयांचे म्युन्सिपल बॉण्डद्वारे कर्ज उभे केले.मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका अत्यावश्यक कामांसाठी कर्ज न काढता अर्बन स्ट्रीट डिझाईन, हरित सेतू, नदी सुधार प्रकल्प आदींसाठी कर्ज काढत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. कर्जाद्वारे श्रीमंत समजल्या जाणाऱ्या महापालिकेस कर्जाच्या खाईत लोटण्याचे काम सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

---

# पिंपरी चिंचवड गृहप्रकल्पांत ३० टक्के विजेची बचत

## वीजबचतीचा जिल्ह्यातील पहिलाच प्रकल्प असल्याचा पीएमआरडीएचा दावा; ४५ इमारतींमध्ये सिस्टीम कार्यान्वित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत उभारण्यात आलेल्या सर्व गृहप्रकल्पांमध्ये सोलरद्वारे वीज जोडण्यात आली आहे. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरे, पंतप्रधान आवास योजना अंतर्गत या प्रकल्पामध्ये ३० टक्के वीज या माध्यमातून निर्माण होत आहे. या ठिकाणी उभारण्यात आलेल्या ४५ इमारतींमध्ये नेट मीटरिंगद्वारे महावितरण या इमारतींना सवलत देत आहे. घरकुल वाटपामध्ये हा प्रकल्प पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना दिलेला हा पहिलाच प्रकल्प असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

प्राधिकरणाच्या वतीने स्पाईन रस्त्यावरील भोसरी येथे सेक्टर १२ या ठिकाणी हे घरकुल उभारले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये ४५ इमारतींमध्ये जवळपास ४ हजार ८८३ सदनिका उभारण्यात आलेले आहेत. यात वन बीएचके ३३१७ तर, टू बीएचके १५६६ आहेत. दरम्यान, या सोसायटीमध्ये सदनिकेच्या घरासमोरील जागा, वाहनतळ आणि जिना या ठिकाणी ट्यूबलाइट आहेत. हे सर्व आता सोलर मिटर द्वारे जोडण्यात आले आहे. त्यामुळे एकूण खर्चापैकी ३० टक्के बचत संबंधित सोसायटीची होत आहे. त्यामुळे दोन हजाराच्या आसपास येणार विज बिल हे ७०० ते ८०० पर्यंत आलेले आहे.




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत उभारण्यात आलेल्या सर्व गृहप्रकल्पांमध्ये सोलरद्वारे वीज जोडण्यात आली आहे. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरे, पंतप्रधान आवास योजना अंतर्गत या प्रकल्पामध्ये ३० टक्के वीज या माध्यमातून निर्माण होत आहे.

### ३० टक्के विजेची बचत

» जवळपास ४ हजार ८८३ सदनिका उभारण्यात आलेले आहेत. सोसायटीमध्ये सदनिकेच्या घरासमोरील जागा, वाहनतळ आणि जिना या ठिकाणी ट्यूबलाइट आहेत. हे सर्व आता सोलर मिटर द्वारे जोडण्यात आले आहे. त्यामुळे एकूण खर्चापैकी ३० टक्के बचत संबंधित सोसायटीची होत आहे

> सेक्टर १२ या गृहप्रकल्पातील पहिल्या टप्प्यात सर्व सोलर यंत्रणा कार्यान्वित झालेले आहेत. त्याचा फायदा सदनिकाधारकांना होत आहे. दोन हजाराच्या आसपास येणार विज बिल हे ७०० ते ८०० पर्यंत आलेले आहे. ३० टक्क्यांहून अधिक बचत होत असून, त्याबाबत सोसायटीधारकांनी समाधान व्यक्त केले आहे.
>
> **- संजय पाटील, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए**

# ओतूर बस स्थानकातील दुर्गंधीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर जुन्नर तालुक्यातील ओतूर बसस्थानकाची मोठी दुर्दशा




**पिंपरी | प्रतिनिधी**

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर जुन्नर तालुक्यातील ओतूर बसस्थानकाची मोठी दुर्दशा दिसून येत असून स्थानकापुढे खड्डेच खड्डे तर स्थानकाच्या मागच्या बाजूला सांडपाण्याचा विळखा पडल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे प्रवाशांना या बस स्थानकामध्ये बसची वाट पाहताना नाकाला रुमाल लावण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे प्रवाशांबरोबरच येथील व्यावसायिक, स्थानिक नागरिक यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बस स्थानक खड्ड्यात असल्याने याठिकाणी पावसाचे साचलेले पाणी काढून देण्यासाठी योग्य नियोजन न झाल्याने पावसाळ्यात याठिकाणी पाण्याची डबकी तयार होत आहेत. बस स्थानकाच्या बाजूलाच सुलभ शौचालय बांधण्यात आले आहे. या सुलभ शौचालयाचे सांडपाणी उघड्यावरच सोडून दिले जात असल्यामुळे बस स्थानक परिसरामध्ये प्रचंड दुर्गंधी पसरली आहे.

याबाबत ग्रामपंचायतीने वारंवार एसटी महामंडळाला पत्र व्यवहार केला. परंतु अद्याप या संदर्भामध्ये कोणतीही उपाययोजना होत नसल्याची खंत ओतूरच्या सरपंच छाया डुंबरे तसेच सामाजिक कार्यकर्ते तानाजी तांबे यांनी व्यक्त केली आहे.

सामाजिक कार्यकर्ते तानाजी तांबे म्हणाले, या संदर्भात अनेकदा मी स्वतः नारायणगावचे आगार व्यवस्थापक वसंत आरगडे यांच्याकडे पत्र व्यवहार केला आहे. अधिकारी येतात पाहणी करतात पावसाळ्यामध्ये खड्डे पडल्यावर ग्रामपंचायत अथवा संबंधित विभाग तात्पुरते खड्डे बुजवतातय परंतु जास्त पाऊस झाल्यावर जैसे थे परिस्थिती निर्माण होते. प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न गेले अनेक वर्ष पाचवीलाच पुजला आहे. जास्तीचा पाऊस आला का या खड्ड्यामध्ये पुन्हा चिखल होतो, पाणी साठते आणि प्रवाशांच्या अंगावर हे चिखल युक्त पाणी उडते. तसेच बाजूच्या खड्ड्यामध्ये पाणी साठून राहिल्याने दुर्गंधी मोठ्या प्रमाणात निर्माण होते. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढू लागल्याने प्रवासी व परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

> भविष्यकाळात या सांडपाण्यामुळे बस स्थानक परिसरातील तसेच ओतूर शहरातील जनतेचे आरोग्य धोक्यात आले तर याला जबाबदार एसटी महामंडळाचे अधिकारी राहतील. आम्ही याबाबतची तक्रार एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करणार आहे.
>
> **- छाया तांबे, सरपंच ओतूर**

> सुलभ शौचालयाचे सांडपाणी बस स्थानकाच्या मागच्या बाजूला उघड्यावर सोडले जात असल्याने दुर्गंधीचा प्रवासी व आजूबाजूच्या दुकानदारांना याचा त्रास होतोय तसेच त्यांच्या आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण होतोय ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. आम्ही हे सांडपाणी ग्रामपंचायतीच्या पाइपलाइनला जोडण्यासंदर्भात ग्रामपंचायतीने सहकार्य करावे, अशी विनंती केली होती. परंतु त्यांच्याकडून योग्य सहकार्य मिळत नसल्यामुळे हा प्रश्न रेंगाळत पडला आहे.
>
> **- वसंत आरगडे, आगार व्यवस्थापक**

> पावसाळ्यामध्ये बस स्थानकामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठते. डास वाढतात. त्यामुळे आमच्या आरोग्यावर देखील विपरीत परिणाम होतो. तसेच सांडपाणी देखील बस स्थानकाच्या मागच्या बाजूला उघड्यावर असल्याने दुर्गंधीचा देखील प्रवासी आजूबाजूचे नागरिकांना त्रास होत आहे. हे सांडपाणी ग्रामपंचायततीच्या ड्रेनेज लाईनमध्ये सोडले जावे.
>
> **- सखाराम मिलखे, वाहतूक नियंत्रक**

# खासदार सुप्रिया सुळेंच व्हॉट्सअॅप स्टेटस चर्चेत! आईचा सल्ला केला अधोरेखित

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २६ वा वर्धापन दिन दोन्ही वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या दिमाखात साजरा

**पुणे | प्रतिनिधी**

१० जून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २६ वा वर्धापन दिन दोन्ही वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या दिमाखात साजरा केला जात आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिनाचा कार्यक्रम बालेवाडी संकुलात होत आहे, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन बालगंधर्व रंगमंदिर येथे होत आहे. दोन्ही ठिकाणाच्या कार्यक्रमाला पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

अशातच शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ठेवलेल्या व्हॉट्सअॅप स्टेटसने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सुळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाच्या दिवशी ठेवलेले व्हॉट्सअॅप स्टेटसमुळे त्या चर्चेत आल्या आहेत. तसेच माध्यमांशी बोलताना दादांची (अजित पवार) आठवण रोजच येते, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. दिवाळी, भाऊबीज आणि इतर सणांना मी त्यांना शुभेच्छा देत असते. मला सहा भाऊ आहेत, सगळ्यांचीच आठवण येते, असे देखील त्या यावेळी पुढे बोलताना म्हणाल्या.

'आपल्या डोळ्यासमोर अन्याय होत असतो, आपण प्रयत्न करत रहायचे,' असे देखील त्यांनी म्हटले आहे. याबाबत बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या माझ्या आईने मला सल्ला दिला आहे आणि तो मी माझ्या व्हॉट्सअप स्टेटसला ठेवला असल्याचा खुलासा त्यांनी केला.



पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचा वर्धापन दिन जल्लोषात साजरा होत असतानाच, पश्चिम महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप घडला आहे. पक्षाचे दोन महत्त्वाचे शिलेदार, सत्यजितसिंह पाटणकर (सातारा) आणि वैभव पाटील (सांगली) हे भाजपात प्रवेश करणार आहेत.

### पश्चिम महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप

» पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचा वर्धापन दिन जल्लोषात साजरा होत असतानाच, पश्चिम महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप घडला आहे. पक्षाचे दोन महत्त्वाचे शिलेदार, सत्यजितसिंह पाटणकर (सातारा) आणि वैभव पाटील (सांगली) हे भाजपात प्रवेश करणार आहेत. यामुळे शरद पवार यांना जोरदार धक्का बसला आहे

### स्टेटसच्या माध्यमातून व्यक्त केल्या भावना

» कर्तव्य करत राहायचं, संस्कार कधी विसरायचे नाहीत.. "सहन करायला शिक" आईने मला सांगितलं होतं, हे मी रोज स्वतःला सांगते. असे म्हणत सुळेंनी आपल्या भावना व्हॉट्सअॅप स्टेटसच्या माध्यमातून व्यक्त केल्या आहेत. 'आपल्या डोळ्यासमोर अन्याय होत असतो, आपण प्रयत्न करत रहायचे,' असे देखील त्यांनी म्हटले आहे